# अमरावती महानगरपालिका, अमरावती

## दिनांक २३/०१/२०२५ तेजी प्राप्त तसेच
## दिनांक ०३/०२/२०२५ रोजी सर्वसाधारण सभा ठरावाची प्रत

**(प्रशासकीय विषय)**

**विषय क्रमांक २०६ -** तात्पुरच्या अनधिकृत जाहिरात फलक, बैनर्स, पोस्टर व इत्यादिवर दंड आकारणी करण्याबाबत

ठराव क्रमांक २०६ - अमरावती महानगरपालिका क्षेत्रात, तात्पुरत्या जाहिरात फलक, बॅनर्स, पोस्टर, व इत्यादि बाबतची परवानगी झोन निहाय वितरीत करण्यात येते. परंतु महानगरपालिका क्षेत्रात बहुतांश ठिकाणी अनधिकृत जाहिरात फलक, बैंनर्स, पोस्टर व इत्यादि लावण्यात येते सदर बैनर्स वेळोवेळी संबंधित झोन व अतिक्रमण विभाग, मार्फत निस्काषित करण्यात येते.

मा. उच्च न्यायालयातील पी.आय.एल. १५५/२०११ मधिल प्राप्त निर्देशनुसार अनधिकृत जाहिरात फलका विरुध्द फौजदारी गुन्हे / दंडात्मक कार्यवाही करण्याबाबत निर्देश दिलेले आहे. यापुर्वि महानगरपालिका क्षेत्रात लागणा-या लहान / मोठी जाहिरात फलक, बॅनर्स, पोस्टर, व इत्यादि करीता प्रती बैनर्स ५००/- रु या प्रमाणे दंड वसुल करण्यात येत होता.

९ मे २०२२ रोजीच्या अधिसूचनेनुसार महानगरपालिका क्षेत्रातील जाहिरात करीता आकाश- चिन्हे आणी जाहिरात प्रदर्शनाचे नियमन व नियंत्रण नियम २०२२ तयार करण्यात आलेले आहे. सदर अधिसुचना मधिल २० अन्वये प्रशासकिय उराव क्र.४० दि.०३.११.२०२२ नुसार विविध जाहिरात परवान्याकरीता शुल्क निश्चित करण्यात आलेला आहे. सदर अधिसुचने नुसार तात्पुरत्या जाहिरात करीता खालील प्रमाणे आकार निश्चित करुन दिलेला आहे. तसेच परवानगी तीन ३ दिवसापेक्षा जास्त येवु शकत नाही. प्राप्त बॅनर्सचे आकार / शुल्क दिवस लक्षात घेता खालील प्रमाणे अनधिकृत बॅनर्स चा दंड आकारणी प्रस्तावित करण्यात येत आहे.

" परिशिस्ट अ"

| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
|---|---|---|---|---|---|
| अ.क्र. | तात्पुरत्या जाहिरात फलकाचा आकार | शुल्क (प्रति दिवस) | तीन दिवसा करीता | प्रशासन फि (५ पट) | दंड |
| १. | ६ x ३ चौ. फुट | ५०/- | १५०/- | २५०/- | ४००/- |
| २ | ८ x ३ चौ. फुट | ७५/- | २२५/- | ३७५/- | ६००/- |
| ३ | ८ x ६ चौ. फुट | १००/- | ३००/- | ५००/- | ८००/- |

सदर दंड तात्पुरत्या जाहिरात फलक, बॅनर्स, पोस्टर, व इत्यादि करीता लागु राहतील.

- १८ चौ. फुट पर्यंत चे कोणतेही जाहिरात फलक करीता ४००/- रु
- १८ चौ. फुट ते २४ चौ. फुट पर्यत चे कोणतेही जाहिरात फलक करीता ६००/-
- २४ चौ. फुट ते ४८ चौ. फुट पर्यंत चे कोणतेही जाहिरात फलक करीता ८००/- रु

महानगरपालिका क्षेत्रातील लावण्यात येणाया अनधिकृत जाहिरात फलक, बैनर्स, पोस्टर, व इत्यादिवर झोन निहाय दंड वसुल करण्याकरीता प्रशासकिय मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे.

उपरोक्त प्रशासकीय विषय सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर करण्यात आला आहे. परंतु, सद्यस्थितीत सर्वसाधारण सभा अस्तित्वात नसल्याने सर्व सभेचे अधिकार प्रशासक यांना असल्याने सदर प्रशासकीय विषयास मंजुरी प्रदान करण्यात येत आहे.

ठराव मंजुर व कायम

| | |
|---|---|
| स्वा./- | स्वा./- |
| नगरसचिव | प्रशासक |
| महानगरपालिका, अमरावती | महानगरपालिका,अमरावती |

नगर सचिव
अमरावती महानगरपालिका,
अमरावती